...गणेशाय नमः॥ ॥ॐ नमोसद्गुरुश्रीमूर्त्ती॥ चराचरतुझ...
र्ति॥ विश्वात्मा विश्वस्फुर्त्ती॥ अमुर्त्तमूर्त्तिगुरुराया॥१॥ तुझ्याम
महिमान सकळशास्त्रा तेणें कोणा जाणे॥ श्रुतीनें घेतले मौन॥ शा
स्त्रें आण वाईली॥२॥ आण वाइली दृष्टांती॥ तुजसमान नाही दुजी स्थि
ती॥ जे जे योजावी उपपत्ती॥ ते ते विभूती पै तुझी॥३॥ तुझ्या प्रभावाची
येसी चि खोडी॥ जे दुजेपण च मूळ ते ते तोडी॥ मग येकपणाचे परवडी
॥ दृष्टांत काढी कोणे कोठे॥४॥ कोठे तुझे स्थान मान॥ हे चि सर्व
थान कळे जाणे॥ अगाध तुझे महिमान॥ केसेनि ध्यान धरावे
॥५॥ हेत मातु दृष्टांत॥ नरी घे ज्याचसे वेत्रांत॥ ते भागवती चा
भावार्थ॥ वोविया आर्त बोलवी॥६॥ ते माझे महादैव आरी खेबो

[illegible]ल॥ सद्गुरूनें केले सरखोल॥ तेथी ले प्रेमाची जे बोल॥ जाणती केव
ळ गुरुभक्त॥७॥ ज्यासि नाही गुरुचरणी भक्ती॥ त्यासी केसेनि
होईल विरक्ती॥ जरी पढिले श्रुती स्मृती॥ शास्त्र विस्तारीं के
लिया॥८॥ करितां साधनाच्या कोटी॥ साधनीं समाधान
नुठी॥ [illegible]लयां सद्गुरु कृपादृष्टी॥ ब्रह्मत्व पुष्टी गुरुभक्ती
॥९॥ [illegible]सद्गुरु जनार्दन॥ सकळ जगाचे अधिष्ठान॥
भूतं भूतात्मा आपण॥ सहजेचि जाण समसाम्ये॥१०॥
समसाम्य सर्व भूतीं॥ ज्यासि चढे सद्गुरुभक्ती॥ तो चि श्री
भागवती॥ [illegible]र्थप्राप्ति प्रवीण॥११॥ जालयां सद्गुरु कृपा

वरी[illegible]॥नकरितां विसत्तिवेकष्ट॥भागवतार्थ होयप्रविष्ट॥भक्ति
उद्धरगा[illegible]थी॥१२॥हृदई जालयांसद्भावो॥भावप्रगटे देवादिदेवो
॥तिणें भागवताचा अभिप्रावो॥सहजेचि चालेठसावे॥१३॥या
लागी करावी गुरुभक्ती॥प्राप्त होइजे भागवतार्थी॥तेथे का
मादाक वितात्ति॥नानायुक्ती किमर्थी॥१४॥किमर्थ करावे शास्त्रा
ध्यान॥किमर्थ धरावे वृथा ध्यान॥चालते बोलते ब्रह्मपूर्ण॥
सद्गुरुचरण साधकां॥१५॥वांचुनी गुरुभजन॥शिष्या
सी नव्हे समाधान॥याहुनी याश्रेष्ठ साधन॥नाहीं जा
ण सर्वथा॥१६॥त्यासद्गुरुकृपापरीपाटी॥येकादशपूर्वार्ध
कोटी॥वाखाणीली जी मऱ्हाटी॥यथार्थ दृष्टी निजबोधे॥१७

[illegible]ळिलीयारसु होये॥तो ठेवितां बहुकाळ न स्राय॥त्याचा
[illegible]यांपाहो॥गुळ होय सपिंड॥१८॥नाहि ठेवीतां नीगाड घरी
॥मग साखर की जे रायपुरी॥ति हि घोटुनीया चतुरी॥नाबत
करी कोरडी॥१९॥तैसे हे श्रीभागवत जाण॥मूळ बोलि
ला श्रीनारायण॥तेचि श्रीव्यासे आपण॥दशलक्षण वर्णिले
॥२०॥तेचि दशलक्षण परवडी॥श्रीशुकमुखे चढली गो
डी॥तेथील कठिण पदबंद मोडी॥टीकाचो खडी श्रीधरी॥
२१॥ते श्रीधरीचे निजव्याख्यान॥भावार्थदीपिका जाण॥त्या
भावाधावे[illegible]भावपूर्ण॥केले निरोपण दोषभाषा॥२२॥मुळि
वक्ता[illegible]नारायण॥व्यासशुक श्रीधर व्याख्यान॥त्यातु

मूळीचे अवतुन गोडपण। येका जनार्दन कवी कर्त्ता ॥ २३ ॥ मूळि
बीज श्री नारायण। ब्रह्मा चे ठाई पेरी ले जाण। तेना रदक्षेत्री
संपूर्ण। ती कृष्ण परिपूर्ण नी डारले ॥ २४ ॥ त्याचे व्यासें दश लक्ष
ण। संपूर्ण केलें साचगण। शुके परी क्षिती चे खळें जाण। मळुनि नि
जकण काढीले ॥ २५ ॥ तचि शास्त्रार्थे जाण। श्रीधरे निज बुद्धिपाखडु
न। काढिले निडारा चे कण। श्रुति सघन सुटंक ॥ २६ ॥ त्याचि पक्कान्न
चो खडी। मऱ्हाटी या मदमोडी। येका जनार्दने केली पखडी। तेजा
णती गोडी नीजाल भोक्ते ॥ २७ ॥ त्या श्रोत्या चे नि अवधाने। जनार्द
नकृपा सावधान। पूर्वार्ध येका जनार्दने। संपूर्ण करणें देशभाषा
... ये प्रथमा ध्याई अनुक्रम। वैराग्य उत्पत्ती चा संभ्रम। केला ॥ ३

...सा पुरुषोत्तम। करीत उपक्रम ब्रह्मलक्षणाचें ॥ २९ ॥ दुसऱ्या पासु
... चतुर्थवरी। नारद वसुदेवा च्या घरी। निमीजायंती प्रश्नोत्तरी। पं
चाध्याई खरी संपविली ॥ ३० ॥ शष्ठमा ध्याई श्री कृष्णमूर्त्ति। पाहो
आली सुरपंक्ती। तिहीं प्रार्थिला श्रीपति। निजधामा प्रती या
वीया ॥ ३१ ॥ ऐकोनि सुरवराची विनंती। देखोनि अरिष्ट भूत द्वा
रावती। उद्धवें प्रार्थिला श्रीपति। निजधामा प्रति भजने ई ॥ ३२ ॥
त्याचि प्र...चे प्रश्नोत्तरी। त्यागयुक्त ज्ञान गंभीर। सप्तमाध्या
ई शार्ङ्गधर। थोडे निफार बोलिला ॥ ३३ ॥ तेथे त्याग संग्र
हलक्षण। यदु अवधूत संवादे जाण। चोवीसा गुरु चे प्रक

रण ॥ केले संपूर्ण अष्टमा नवमा ॥ ३४ ॥ अद्वासंग्रहो ज्ञानविम्वा ॥ तेथे
नानामतांचा मतनीरासु ॥ दशमाध्याइं हृषीकेशु ॥ ज्ञानविलास
बोलिला ॥ ३५ ॥ अकरावे अध्याई जाण ॥ बंधमुक्ताचे वैलक्षण ॥
सांगोनि साधुचे लक्षण ॥ भक्तीचे संपूर्ण दाविले रूप ॥ ३६ ॥ भाग
वती बारावा अध्यावो ॥ अतिगुह्य बोलिला देवो ॥ तेथी लल्लावि
ता अभीप्रावो ॥ पडे संदेहो सज्ञान ॥ ३७ ॥ बारावे अध्याची कां
ली ॥ युक्ती प्रयुक्तीचा नातुडे बोली ॥ जनार्दन कृपा माउली ॥
तेणें मागी दाविली ग्रंथाची ॥ ३८ ॥ तेरावा दशाध्याईचे निरूपण ॥
[…]त्संगाचा महिमा गहन ॥ कर्माचा कर्ता कोण ॥ त्यागी ते लक्ष
[…]र्माचे ॥ ३९ ॥ तो द्वादशाध्यावो एकतां ॥ ज्ञानसंलग्न होये ॥



। आडवि रोक विषयावस्था ॥ तेणें बाधक ता साधका ॥ ४० ॥
[…]गुण वैशंम्याचे जे लक्षण ॥ तेणें विषयावस्था गहन ॥ तेथे सत्व
शुद्धिचे कारण ॥ केले निरूपण त्रयोदशी ॥ ४१ ॥ ते चित्रसंगी
येथो चित ॥ चित्तविषयाचे जे ग्रंथित ॥ उगवावया हंसगीत
॥ सुनिश्चीत सांगीतले ॥ ४२ ॥ हंसगीते निरोपिले जे ज्ञान
॥ समाधिपर्यंत समाधान ॥ तेचि साधावया साधन ॥ चौ
दावां आपण बोलिला देवो ॥ ४३ ॥ त्या साधना माजि मुख्य
भक्ती ॥ सगुण तेचि निर्गुण मास्ती मुर्ती ॥ योगयुक्त ध्यानस्थि
ती ॥ बोलिला श्रीपत्ति चतुर्दशी ॥ ४४ ॥ विविधा सिद्धीची

धारणस्थिती ॥ देवें सांगीतली उद्धवाप्रती ॥ सिद्धिबाधका मासी
घ्राप्ती ॥ हे पंधराव्या अध्यायी निरूपिलें ॥ ४५ ॥ येवं पंधराध्याई पूर्वा
र्ध ॥ निरूपण जालें अतिशुद्ध ॥ आतां उत्तरार्ध ॥ तो क
था संमंध अवधारा ॥ ४६ ॥ षोडशीं भगवद्विभूती ॥ सतरा
अठरा अध्यायाप्रती ॥ वर्णाश्रमकर्मगती ॥ विधानस्थिती
निरूपण ॥ ४७ ॥ येकुणीसावे अध्याई गहन ॥ ज्ञान निर्ण
याचे महिमान ॥ उद्धवाचे येमादी प्रश्न ॥ सांगीतले ज्ञान प
रिपाकें ॥ ४८ ॥ त्या ज्ञानाधीकाराचे योग ॥ अज्ञान ज्ञान म
[illegible]भाग ॥ विसावे अध्याई श्रीरंग ॥ त्रिविध विभाग बोलि ॥ ५

॥ ४९ ॥ तेथे गुणदोषाची अवस्था ॥ उद्धवें ठेविली वेदांचा
माथां ॥ ते वेदवाद संस्था ॥ केली तसताये कविसावा ॥ ५० ॥
ते चि वेदवाद विसत्री ॥ तत्वाची संख्या किती ॥ तितल संख्या श्री
पती ॥ केली उपपत्ती येथान्वये ॥ ५१ ॥ सकळ तत्वाचे विवंचन ॥ प्रक
ती पुरुषाचे लक्षण ॥ जन्ममरणांचें प्रकरण ॥ केलें निरूपण बा
वीसावां ॥ ५२ ॥ साहोनियां परापराध ॥ स्वये राहावे निर्द्वंद्व ॥ रु
भिक्षुगीत संवाद ॥ केला विषद तेवीसावा ॥ ५३ ॥ अद्वैती राहा
वया स्थिती ॥ चोवीसावे सांख्य विसत्री ॥ निर्गुणपासु निज्ञा
नःसत्ती ॥ गुणक्षये अंती निर्गुण उरे ॥ ५४ ॥ आदि निर्गुण अंती निर्गुण

॥६॥ ...मध्यभासलेंमिथ्यासगुण॥ येअद्वैतग्रासीलागीजाण॥ केलेंनि
रूपणसांख्याचें॥ ५५ तेंमिथ्यागुणप्रकृतीयुक्त॥ त्रिगुणाचासं
न्निपात॥ बोलिलापंचविसाव्यांत॥ निर्गुणनिजनिष्ठा॥ ५६॥ सवि
साव्याअध्यायाप्रति॥ अनिवारअनुतापाचीशक्ती॥ भोगिला
उर्वशीकामप्राप्ती॥ पावलाविरक्तीपुरूरवा॥ ५७॥ भजनक्रि
यामुक्तिलक्षण॥ वैदिकीतांत्रिकिमिश्रभजन॥ यानउद्धवाप्र
श्नचेंनिरूपण॥ केलेंसंपूर्णसत्ताविसावा॥ ५८॥ महायोग्याचें
योगभांडार॥ परमज्ञानेंज्ञानगंभीर॥ निजसुखाचेंसुखसार
केवळचिन्मात्रअठाविसावा॥ ५९॥ याचिअध्यामाजिजा
संसारअसंभावाचाप्रश्न॥ उध्धवेंकेलाअतिगहन॥ त्या ॥६

प्रतिवचनदीधलेंदेवें॥ ६०॥ येकादशाचानिजकळसु॥ भक्ति
मांचाअतिविलासु॥ तोबोलिलाअठाविसु॥ ज्ञानोपदेशुभ
क्तियुक्त॥ ६१॥ पुढीलदोअध्यायांत॥ स्त्रीपुत्रादिकुळाचाघात॥
दुंडळीनांज्ञानसमर्थ॥ तेप्रत्यक्षभूतहरीदावी॥ ६२॥ ब्राह्मण
चाशापकठिण॥ शापेंवधीलाश्रीकृष्ण॥ इतराचीकथाकोण॥
कुळनिर्दळणब्रह्मशापें॥ ६३॥ ब्राह्मणचाकोपसमर्थ॥ सगळा
समुद्रदे…खामुत॥ शिवाचाजालालिंगपात॥ ब्रह्मसोभार्यति
मिशांड॥ ६४॥ यालागीसज्ञानअथवामुग्ध॥ तेंहीनकरावा
ब्रह्मविरोध॥ हेंचिदावावयामुकुंद॥ कुळक्षयप्रसिद्धदाख

७

वी ॥ ६५ ॥ निजदेहासी जो करी घात ॥ तो जराव्याधके ल्या मुक्त ॥
येथवरी ज्ञाता देहातीत ॥ क्षमायुक्त तो सज्ञान ॥ ६६ ॥ ये कुणतीस
पर्यंत ॥ केले उपदेसिले ज्ञानार्थ ॥ पुढील्या दो अध्यायांत ॥ स्व
येदावीत वीदेहत्व ॥ ६७ ॥ राम अयोध्या घेउनी गेला ॥ कैसे
निजदेहो ही सांडीला ॥ येणे देहाभिमान मिथ्या केला ॥ तेरा
मा पुढील्यां मुमुक्षां ॥ ६८ ॥ पंधरा अध्याय पूर्वार्द्ध ॥ आख्यान
जाले अतिशुद्ध ॥ सूत्रप्राये उत्तरार्द्धी ॥ दाविले विषद अध्या
यार्थे ॥ ६९ ॥ साच सद्गुरु श्रीजनार्दन ॥ श्रोता द्यावे सावधा
पुढील उत्तरार्द्ध आख्यान ॥ येका जनार्दन बोलवी ॥ ७० ॥ ७

...लयां वसंताचे रीघवणे ॥ वृक्ष सुपुष्प सफळ होते जैसे ॥ तेवी ज
नार्दन कृपागुणे ॥ सार्थक वचनेक वी त्याची ॥ ७१ ॥ गगनी उ
गवल्या अंशुमाळी ॥ जो विवीका शाल्यावन कमळी ॥ तेवि ज
नार्दन कृपा मेळी ॥ कवित्व नव्हाळी विकाशे ॥ ७२ ॥ वेणु घेउ
नी याहाते ॥ विश्व मोहिले कृष्णनाथे ॥ तेविं कविश्वर करू नि मा
ते ॥ वक्ता येथें जनार्दन ॥ ७३ ॥ तो जनार्दन कृपाक्षी राखि ॥ ज्या
चे कृपेसी नाहीं अवधी ॥ तेणे उत्तरार्द्धी प्रवेशे बुद्धी ॥ अर्थसिद्धी
समवेत ॥ ७४ ॥ मागील कथा संगती ॥ पंधराव्या अध्यायाच्या
अंती ॥ सिद्धि बाधका मास्त प्राप्ति ऐसे श्रीपति बोलीला ॥ ७५ ॥

॥८॥ ऐसंमांडुनी सिधीचे ध्यान ॥ माझ्यास्वरूपीराखावेमन ॥ हे ऐकोनिश्रीकृष्णवचन ॥ उधवेप्रश्नमांडीला ॥ ७६ ॥ श्लोक ॥
उधवउवाच ॥ त्वंब्रह्मपरमंसाक्षादनाद्यंतमपावृतं ॥ सर्वेषामपिभावानांत्राणस्थित्यप्ययोद्भवः ॥ १ ॥ टीका ॥ उधवम्हणे कृष्णनाथा ॥ विनंतीअवधारीसमर्था ॥ तुझ्याविभुतीसमस्ता मजनकळतासांगाव्या ॥ ७७ ॥ भुतभौतिकांचेकारण ॥ तुझेनि जन्मस्थितिनिधन हेतुकेकरूनिअकर्ताजाण ॥ ब्रह्मपरिपूर्णतुयालागी ॥ ७८ ॥ उत्पतीस्थीतिमरण ॥ भूतांचेप्रकृतीकरीतएण ॥ तेप्रकृतीतुजअधीन ॥ तुझेनिचलणप्रकृतीसि ॥ ७९ ॥ ॥८॥

लागीप्रकृतीतेपरतंत्र ॥ अनादिअव्ययेअपार ॥ तेप्रकृतीतुजअधीनसाचार ॥ तुझ्याश्रुतीसीपारनकळेची ॥ ८० ॥ प्रकृतीसीतुझेंआवरण ॥ तुंअनंतगानिवारण ॥ जीवाचेस्वरूपतुआपण ॥ परीजीवपणतुजनाही ॥ ८१ ॥ जीवतीतुकाअज्ञानयुक्त ॥ तुझानाज्ञानातीतनिश्चीत ॥ यालागीब्रह्मतुसाक्षात ॥ अविनाशवतअपरोक्ष ॥ ८२ ॥ तोतुंअपरोक्षकैसाम्हणसी ॥ सार्विसर्वत्रसबाह्यअससी ॥ ऐसाअसोनिअतर्क्यहोसी ॥ हृषीकेशातुयेक ॥ ८३ ॥ श्लोक ॥ उच्चावचेषुभूतेषुदुर्ज्ञेयमकृतात्मभिः ॥ उपासतेत्वांभगवन्यथातथ्येनब्राह्मणाः ॥ २ ॥ टीका ॥ मशकादि

हिरण्यगर्भपर्यंत ॥ तु सबाह्य सर्वभुती संतत ॥ येसी यातु ते नि
श्चित ॥ श्राल्लए जाएत वेदार्थें ॥ ८४ ॥ श्राकुल्लु निउपनिषदार्थ
॥ तुझ्या ठाईं भजनयुक्त ॥ ते तुज सर्वगता तें जाएत ॥ सुनिश्ची
त सर्वात्मा ॥ ८५ ॥ त्या सर्वात्म्याचे पाल्लतां पार ॥ श्रंची त्यानंत ऐ । अच्युत
श्वर्यधर ॥ त्या तुज नेएती प्राकृत नर ॥ एक विचार तयाचा ॥
८६ ॥ जे मनाचे विकल्ले ॥ उपस्थाचि श्राकल्ले ॥ जे रसनेचे पास
ए जाल्ले ॥ निद्रेने केले घरजवाई ॥ ८७ ॥ त्यासी स्वतसिद्ध स्व
रूपप्राप्ती पाहीं ॥ सर्वगत न पडे ची ठाईं ॥ निजात्मता नक
रेकही ॥ सदा विषईं भुल्लले ॥ ८८ ॥ विषईं चंळ श्रंतःकर ॥ ९
च
ण त्यासी न करू ध्यान सगुए ॥ निर्गुणी प्रवेशेना मन ॥ श्रज्ञान
जन कावितरति ॥ ८९ ॥ नकरिता नाना विसत्ती ॥ न धरीत्तां ध्या
नास्थिती ॥ तुझ्या उत्तमा ज्या विभूती ॥ त्या सांगनी श्चीती भज
नासी ॥ ९० ॥ श्लोक ॥ येषु येषु च भावेषु भक्त्या त्वां परमर्षयः ॥
उपासीनाः प्रपद्यंते संसिद्धिं तद्वदस्व मे ॥ २ ॥ टीका ॥ ज्या ज्या
तुझ्या विभूती ॥ पूर्वी उपासील्या संती ॥ दृढ भावे करूनी भ
क्ती ॥ तुझी स्वरूपप्राप्ती पावल्ले ॥ ९१ ॥ त्या सकळ तुझ्या
विभुती ॥ कवएस्था तिक वएबेक्ती ॥ कवए भावो कव
एगती ॥ हे निश्चीती मज सांगे ॥ ९२ ॥ ल्लएसी सकळ

भूतागप्रती ॥ तुझिबोळखमाझ्याविभुती ॥ तरीतेतुझीअतर्को
स्थीती ॥ नकलेश्रीपतिआमचेनि ॥ ९३ ॥ श्लोक ॥ गूढश्चरसिभू
तानांभूतात्माभूतभावनः ॥ नत्वांपश्यंतिभूतानिपश्यंतंमोहि
तानिते ४ टीका सर्वभूतांचाहृदयस्थ ॥ हृदईअसोनीअ
तिगुप्त ॥ त्यातुतेभूतेसमस्त ॥ नदेखतदेहभ्रमें ॥ ९४ ॥ त्या
देहभ्रमासीदेवराया ॥ मुळकारणतुझीमाया ॥ तेथेतु
झीकृपाजाल्यां जायलयासगुणेंसी ॥ ९५ ॥ मगसर्व
त्रसर्वांठाईं ॥ सर्वभुतींसबाह्यदेहीं ॥ तुझेस्वरूपवाहुचे
ठाईं ॥ प्रगटेपाहासदोदित ॥ ९६ ॥ येकदेतुझेरूपेचेक ॥१०

हि
ईं ॥ तेपांवीजेकवणेंगुणें ॥ यालागीतुझ्याविभूतिउपासने ॥ तुझे
रूपकारणेंगोविंदा ॥ ९७ ॥ याचीलागीविभुतीचीस्थिती ॥ समु
ळसांगावीमजप्रती ॥ तेचिअर्थीचीविनंती ॥ पुडतपुडतीकरी
तुसी ॥ ९८ ॥ श्लोक ॥ याःकाश्चभूमौदिविवैरसायांविभूतयोदि
क्षुमहाविभूते ॥ तामह्यमाख्याह्यनुभावितांस्तेनमामितेतीर्थपदांघ्रिपद्मं ५ टीका ॥ स्वर्गमृत्युपातालस्थिती ॥ वि
स्ताराच्यादशादिशाप्रति ॥ त्यासमस्ताहीतुझ्याविभूती ॥
सांगश्रीपतिमजलागी ॥ ९९ ॥ ऐसाकरूनियाप्रश्न ॥ उद्ध
वेघातलेलोटांगण ॥ सकळतीर्थांचेजन्मस्थान ॥ मस्तकीं

परएवंदिले ॥ १०० ॥ ऐको निउध्दवा आप्रश्नासी ॥ परमसंतोश
हृषीकेशी ॥ पुरुस्कारुनी उध्दवासी ॥ कायेत्यासी बोलिला ॥
१०१ ॥ जो वैरीगजयूथपंचानन ॥ कोदंडदीक्षाव्रतापगहन ॥ स
खाजीवलगपरु यंताजाण ॥ जीउप्राणतोमाझा ॥ २ ॥ ज्या
चेरथीचेमीधुरेवरी ॥ ज्याचेअश्वाचेमीवागारे घरी ॥ जोउपदे
सीलाकुरुक्षेत्री ॥ उभयेसैन्यामाझारी रणंगणी ॥ ३ ॥ तोन
रावतारअर्जुन ॥ त्याचायैसातुझाप्रश्न ॥ येसाउध्दवासीसं
बोधोन ॥ कायवचनबोलिला ॥ ४ ॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवा
च ॥ एवमेतदहंप्रष्टः प्रश्नंप्रश्नविदांवर ॥ युयुत्सुनाविनश
नपत्नैरर्जुनेनवै ॥ ६ ॥ टीका ॥ हाचिप्रश्नमजकारणे ॥ ॥ ११ ॥

…पुसीलाअर्जुने ॥ जेव्हां तिरस्कारुनी दुर्योधने ॥ युध्दस
त्राणे मांडीले ॥ ५ ॥ अरिनिर्दळणप्रतापपूर्ण ॥ धीरवीरअग्र
णसज्ञान ॥ प्रश्नकर्त्यामाजि विचक्षण ॥ माझाआत्मा
जाणअर्जुन ॥ ६ ॥ तेणेअर्जुने कुरुक्षेत्री ॥ युध्दसमर्दमहामा
री ॥ स्वजनवधाचें भय भारी ॥ हाचि प्रश्न करी मजते व्हां ॥
श्लोक ॥ ज्ञात्वा ज्ञातिवधं गर्ह्यमधर्मं राज्यहेतुकं ॥ ततोनि
वृत्तो हंताहं हतोयमिति लौकिकः ॥ ७ ॥ सतदा पुरुषव्याघ्रो
युक्त्या मे प्रतिबोधितः ॥ अभ्यभाषत मामेवं यथात्वं रणमू
र्धनि ॥ ८ ॥ टीका ॥ केवळ राज्यलोभाकारणे ॥ गुरुगोत्रपि

त्रुवधने ॥ हे अतिनिंद्यमजकारणे ॥ नाहीजुझणेप्राणेंतें ॥ ८ ॥
लोकिकाधर्मप्रवृत्ती ॥ मीमारीता हे मरती ॥ ऐसी महामोहा
चीभ्रांती ॥ उपजली चितीअर्जुना ॥ एॆ ॥ राज्यलोभाचे धरुनि
वर्म ॥ ज्ञातिवधाचेनी घेकर्म ॥ हाकेवळमजअधर्म ॥ धर्मा
चास्वधर्मबुडेल ॥ १० ॥ ज्याचेतीर्थघ्यावेप्रतिदिनी ॥ जे
पूजावेवृंदावनी ॥ तेरवोचुनीतीरवटांबाणी ॥ भोगावीअ
वनीस्वगोत्ररुधिरे ॥ ११ ॥ स्वगोत्ररुधिराचापुर ॥ पृथ्वी
वरीवाहेलदुस्तर ॥ तेणेंआलीलोडनियाराज्यधर ॥
ऐकेमर्मम्हाघोरनकरवेमज ॥ १२ ॥ कुलीसुपुत्रवांछीजे ॥ १२
…बाणखोचावेत्या आहदई ॥ पापरीपूर्वजापाही ॥ जाला
उत्तेराईमानावे ॥ १३ ॥ ज्याचेकरावेश्राद्धतर्पण ॥ त्याचेबाणवरी
घ्यावेप्राण ॥ भलेपुर्वजाजालेउत्रीर्ण ॥ आलीनागवणनिजधर्मा
॥ १४ ॥ श्लोकसंमतीचा ॥ हतोवाप्राप्स्यसिस्वर्गंजित्वावाभोक्ष्य
टीका ॥ सेमहीं ॥ ॐ युधिनिमे त्यांस्वर्गगती ॥ जयोआल्याराज्यप्रा
प्ती दोन्हीनश्वरश्रीपति ॥ कोणेहितार्थीजुंझावे ॥ १५ ॥ ऐसेनि
अनुतापेजाण ॥ सांडुनियाधनुष्यबाण ॥ शोकाकुलीतअर्जु
न ॥ म्लानवदनरणरंगी ॥ १६ ॥ तेकाळीमीचिजाण ॥ तोमहा
वीरपंचानन ॥ नानायुक्तीकेलेसमाधान ॥ तेहिलक्षणअ

वधारी ॥१७॥ अर्जुनांदेहोतोतुकांनश्वर ॥ मळमूत्राचेकोठार ॥
करीतांनानाउपचार । मरणतत्सरक्षणीक ॥१८॥ जीवनित्यनिर्म
ळ । अजुअव्ययअचळ । अछेद्यअभेद्यअमळ ॥ अवंचलनीज
नित्य ॥१९॥ अर्जुनायेकसाचे । देहोतुझेनिप्रयत्नेंवांचे ॥ जीव
तुझेनिमारीलानवचे । पातकहत्येचेअहंभावें ॥२०॥ हेकां
सैन्यतुवांअसतेंकेलें । तरीतुझेनिजातेंमारीलें ॥ मीमारिता
येऐसेबोले । तुजचालोविलेंअभीमाने ॥२१॥ जोदेहाचानिर्मा
णकरिता । तोचिदेहाचासंहर्ता । तुकरणेंमारणेंपरता
वेर्थअहंताघेतोसी ॥२२॥ जरीहेतुअहंतानसंडीसी । तरी ॥१३

सकळहत्याचीयारासी । सांचचीआल्यातुजपासी । दोशी
जालाशीअर्जुनां ॥२३॥ ऐकबापापार्था । देहादिकर्माचीअहं
ता । जोघेआपुलीयामाथां । तोदोषीसर्वथातीहीलोकी ॥२४
॥ लोकास्वधर्मचीतुपुससी । तरीऐकक्षेत्राच्याक्षत्रधर्मासी
॥ समरंगणीपित्रपुत्रासी । वधीतांक्षेत्रासीदोषनाही ॥२५॥
युद्धह्मणीजेस्वधर्मतीर्थ । समरंगणीनीमेतोनित्यमुक्त । ते
तुजनिजभाग्येंप्राप्त । तेचितुअन्होतमानिसी ॥२६॥ दोषअ
हंतेच्यामाथा । तोजोनातळेअहंता । तोचिकर्मकरूननिअ
कर्ता । भोगुनीअभोक्तातोयेक ॥२७॥ तोचिसंग्रामाजिनीः

संग ॥ अवघे जग तो येक लासांग ॥ तो जो निराभिमानी असंग ॥
तो सौराचा गसमरंगी ॥ २८ ॥ अर्जुना अभिमान सांडितां ॥ तुं म
ज्ञी पावसी समसाम्यता ॥ तेव्हा सकळ पापाची वार्ता ॥ तुजस
र्वथा स्पर्शेना ॥ रवी ल एसी केवी जाय अंधता ॥ तरी मजला
लक्षुनी तत्वतां ॥ स्वधर्मकर्मा तें आचरतां ॥ चित्तशोधकता
तेणें होय ॥ ३० ॥ निर्मळत्व आलिया चित्ता ॥ तो लागे साक्षी
या भक्तीपंथा ॥ भजने माझी समरसता ॥ माझ्या निज भ
क्तां तत्काळ ॥ ३१ ॥ अर्जुना सांडावया अभीमान ॥ तु नाये
कसी माझें वचन ॥ तरि जन्ममरणाचें भूषण ॥ सकळ ॥ १४ ॥

दोष जाण भोगीसी ॥ ३२ ॥ तु नित्यमुक्त अज अव्ययो ॥ हा बुडेल तु
झा सद्भावो ॥ मग जन्ममरणाचा निर्वाहो ॥ अतिश्रम पावो भोगी
सी ॥ ३३ ॥ यालागी करणें न करणें दोन्ही ॥ प्रकृतीचे माथां ठेउनी
॥ तुका या वाचा मनी हुनी ॥ मज लागुनी शरण रीघ ॥ ३४ ॥ या प
री गात्वतां ॥ मज आवेश शरणें येता ॥ तुज सकळ पापाची वार्ता ॥
मी सर्वथा सीवो नेदी ॥ ३५ ॥ यालागी कोदंडपाणी ॥ मर ते मारी
ते साहुनी दोन्ही ॥ सोरा होई रणांगणी ॥ मी तुज लागुनी उद्ध
रीन ॥ ३६ ॥ तु येक मर्क करीता ॥ मी येक येथे उद्धरीता ॥ एसे भि
न्न लगापार्था ॥ माझ्या शरण गता असेना ॥ ३७ ॥ मज अनं

भी०ए०
॥१५ ताशरणयेणें॥आणीजीवब्रह्मवेगळेनुरेजाण॥गुळदगडायेसेजीण॥
अनन्यपणनव्हेशरण॥३८॥सरीतासागराशरणगेली॥तेसमुद्र
चीहोऊनीठेली॥पुडतीपरतावयामुकली॥समरसलीसिंधुसें
॥३९॥गंगापावोनिसिंधुलासी॥मागीलयावाचीनात्यासी
॥तेवीसबाह्यआत्मसमरसी॥शरणअरुनिशि॥अखंडवे॥४०॥
दीपदावाग्नीभेटोगेला॥तोतेकडाचीहोऊनीठेला॥तेविमज
लागीजोशरणआला॥तोमीजालाअर्जुना॥४१॥पार्थपरीसपां
चीक्रप्राणाचे॥हेभूताकारमजअच्युताचे॥ऐसेसद्भावेजो
देखेसाचे॥त्यासीब्रह्मसायोज्याचेंसाम्राज्यलाभे॥४२॥म ॥१५

जअजन्म्याचेजन्मस्थिती॥संसारमुळीमुख्यभ्रांती॥तेथेमीमा
रिताहेमरती॥कोणयुक्तीमानावी॥४३॥मृगजळजेथेनसे॥तेथे
तवकोरडेअसे॥माझेठाईआभासे॥तेथेतरंगअसेआव्हा
सकाय॥४४॥तेविसंसाराचेरूपनाम॥ठेवितीतेथेनिखळब्र
ह्म॥हाचिज्याचास्वभावोपरम॥तिचाळतेब्रह्मवर्ततांदेही॥
४५॥देहाजडत्वनबंधीकर्म॥आत्मानातळेधर्माधर्म॥हेसा
चज्यासीकळलेवर्म॥तोचाललेपरब्रह्मवर्ततादेही॥देही
४६॥देहीवर्ततांतोविदेह॥विदेहतोचित्याचेदेह॥हेमाझे
परमगुह्य॥अर्जुनासीपाहेसांगीतले॥४७॥यापरीम्यां

ना०ए०

॥१६॥ नानायुक्ती युधीष्ठीप्रबोधीला सुभद्रापती। तेणें ही मज करूनि
विनंती। पुसी त्या विभुती तुझ्या ऐस्या ॥४८॥ ज्या सांगीतल्या
अर्जुनासी। त्याची सांगेन तुजपासी। ऐसे पुरस्कारूनी उ
द्धवासी। निजविभुती त्यासी सांगत ॥४९॥ उद्धवा ज्या पु
सी त्या विभुती। त्या माझ्या मज न गणवती। मी जगदात्मा
त्रिजगती। संख्या स्थीती गणी कोण ॥५०॥ श्लोक ॥ अहमा
त्मोद्धवामीषां भूतानां सुहृदीश्वरः। अहं सर्वाणि भूतानि ते
षां स्थित्युद्भवाप्ययः ॥१९॥ टीका ॥ मी हृदयस्थ समर्थ हृदई
॥ त्या मज जीव मांगे जे जे काळी। त्यासी वीमुख न कतां काळी॥ ॥१६

पुरवी सर्वदा ईश्वर ले ॥५१॥ जीव अति अडलेपणें। जे मागे मज का
रणें। ते म्यां त्यासी अलोट देणें। या लागी म्हणणे ईश्वर मज ॥५२
॥ मी आ[illegible] आराम असे हृदई। हा विश्वास ज्यासी नाही। ते मृगज
ळाच्या डोही। नावे सगट पाही बुड बुडो गेले ॥५३॥ तेथें ना
व करावयाचे कष्ट। वृथा गेले गा फुकट। तेवी सो सुनीया
साधन कचाट। साधने सगट बुडोनि गेले ॥५४॥ माझे प्रा
प्तीचे [illegible] वर्म। मी हृदई असे परब्रह्म। हे चि ज्याचे नीत्य क
र्म। ते [illegible] परम पै माझी ॥५५॥ मी सर्वभूत हृदयवासी॥
सुहृद सोयरा मि सर्वांसी। मी नियंता ईश्वर सत्ये सी। न्याय स

कभुतांसीमीयेक॥५६॥ येवंसर्वभूताचामीस्वामी॥ येसर्वभुते
हीमी॥ भुताचेजन्मभुमीचीभूमी॥ उत्पादीकर्मीमीकर्ता॥५७
॥कर्षी नाचीयापरी मीश्रजीपाळीसंहरी॥ ब्रह्माविष्णुत्रिपु
रारी॥ गुणावतारीमीयेक॥५८॥ कर्माचीक्रियाशक्ती॥ तेहिमी
म्हणेश्रीपति॥ हेहिबोलिलीस्थिती॥ विशेषविभुतीतेयेक
॥५९॥ श्लोक॥ अहंगतिर्गतिमतांकालःकलयतामहं॥ गु
णानांचाप्यहंसाम्यंगुणेन्यौत्पत्तिकोगुणः॥१०॥ टीका॥ गती
मित्यामाजीगती॥ तेमीम्हणेलक्ष्मीपति॥ गतीसीमाझेनि
नीजगती॥ जाणनिश्चीतीउद्धवा॥६०॥ चेतनेनेसर्वाहि ॥१७

गती॥ तेचेतनाचैतन्यशक्ती॥ चेतनेस्तवंइंद्रियप्रवृत्ती॥ यवंग
तीचीगतीमीयेक॥६१॥ सकळागतीचीपरमागती॥ प्राणयां
सीमुख्येलेंमुक्ती॥ तेमुक्तीसीमजमाजिमुक्ती॥ यवेगतीचीग
तीमीये॥६२॥ सुरनरआकळीतां॥ तेजाणकोंचीसत्ता॥ त्या ळा
काळाचामीआकळिता॥ जाणतत्वतामीमहाकाळ॥६३
तींहीगुणाचीसमाधानअवस्था॥ तेमीजाणगानीजभ
क्ता॥ अकृत्रिमगुणजोधर्मता॥ तोमीम्हणेतत्वताश्रीहरी॥६४
॥श्लोक॥ गुणीनामप्यहंसूत्रंमहतांचमहानहं॥ सूक्ष्माणामप्यहंजीवोदुर्जयानामहंमनः॥११॥ टीका॥ गुणीम्हणेमाहेवि

गी०१०४० अ०
॥१८॥
कारण ॥ त्यामज [illegible]जी सूत्रक्रियाप्रधान ॥ मायेचें प्रथमकारण
जाण ॥ तो गुणत्रासंपूर्ण उद्भवा ॥ ६५ ॥ जगीं आकाश थोरपाहीं ॥ तेमज
माजीखें[?]लपडाई ॥ माझ्यामहत्वाचीनवाई ॥ मजहीनीखिती
नेमेना ॥ ६६ ॥ महत्तत्व ज्ञानप्रधान्य ॥ तेमीह्मणेनारायेण ॥ सूक्ष्ममामा
जीजीवमीआपण ॥ ब्रह्मादिकाजाणअंतकीं ॥ ६७ ॥ दुर्जयामाजी
मीमन त्यासीजिंकावयाजाण ॥ मजवेगळीआगवण ॥ आणि
कासीजाणअसेना ॥ ६८ ॥ मजलक्षीतांमनआकळे ॥ मजवि
सरतांतेंचौताळे ॥ मननधरवेशास्त्रबळें ॥ मननाक
ळमजवीण ॥ ६९ ॥ मनतेंमीचीआहें ॥ मजचिंतितांतेंवि
रोनीजाये ॥ मजवीसरतांतेंपाहें ॥ मगसैराजायसुनाट ॥ ७० ॥ ॥१८

श्लोक ॥ हिरण्यगर्भोविदानांमंत्राणांप्रणवस्त्रिवृत् ॥ अक्षरा
णामकारोस्मिपदानिछंदसामहं ॥ १२ ॥ टीका ॥ वेदअध्यापकप्र
सिद्ध ॥ हिरण्यगर्भह्मणेमीगोविंद ॥ माझेनिजगींअनुलंघ्य
वेद ॥ वेदवादतोहीमी ॥ ७१ ॥ ॐकारेविणमंत्रश्रेणी ॥ तेजा
णबालकाचीकाहाणी ॥ मंत्रींॐकारमीचक्रपाणी ॥ स
कळमंत्राचेंनिपावन ॥ ७२ ॥ अक्षराआंत[illegible]रासी ॥ आकां
रुआगळासर्वासी ॥ तोअकारमीहृषीकेशी ॥ निश्चयेसी
उद्धवा ॥ ७३ ॥ अकारउकारमकार ॥ अर्धमात्रेसीउच्चार
॥ यानावबिंदुयुक्तॐकार ॥ पावनमंत्रयेणेसी ॥ ७४ ॥ ॐ

गी०ए०
।।१९।। दामाजिगायत्रीछंद।सकळद्वंद्वामाजिनिर्द्वंद्व।।तोमीह्मणेगो
विंद।।पूज्यद्विजवृंदयेऐविमज।।७५।।श्लोक।।इंद्रोहंसर्वदेवा
नांवसूनामस्मिरुक्मवाट्।।आदित्यानामहंविष्णुरुद्राणांनी
ललोहितः।।१३।।टीका।।देवामाजिइंद्रजाण।वसुमाजिमी
हुताशन।।आदित्यामाजिमीवामन।रुद्रामाजिजाणनी
ललोहित।।७६।।श्लोक।।ब्रह्मर्षीणांभृगुरहंराजर्षीणाम
हंमनुः।।देवर्षीणांनारदोहंहविर्धान्यास्मिधेनु।।१४।।टी पु२
का।।शापूनब्रह्मालापूज्यकेला।।शिवाचानैवेद्यत्यागविला
।।विष्णुहृदयीलाताविला।।भृगुवारवाणिला।श्रीवत्से।।७७।। ।।१९

ऐसाऋषीमाजिसंपन्न।।भृगुतोमीह्मणेश्रीकृष्ण।।मनुस्वरूपी
मीआपण।।राजर्षीजाणमुख्येले।।७८।।देवऋषीमाजिनारद।।
तोमीह्मणेगोविंद।।कामधेनुअतिशुद्ध।।स्वरूपप्रसिद्धतेमा
झे।।७९।।श्लोक।।सिद्धेश्वराणांकपिलःसुपर्णोहंपतत्रिणां
।।प्रजापतीनांदक्षोहंपितृणामहमर्यमा।।१५।।टीका।।सिद्धा
माजिकपिलमुनेश्वर।।तोमीह्मणेशारंगधर।।पक्षामाजि
खगेश्वर।।तोमीश्रीधरगरुडरूप।।८०।।प्रजापतीमाजी
मुख्य।।कळकळऐतोमीदक्ष।।पितृगणामाजिअध्यक्ष।।
अर्यमाप्रत्यक्षस्वरूपमाझे।।८१।।श्लोक।।मांविष्णुरुद्रदैत्या

॥२०॥ नांप्रल्हादमसुरेश्वरं॥सोमंनक्षत्रौषधीनां॥धनेशंयक्षरक्ष
सां॥१६॥ऐरावतंगजेंद्राणांयादसांवरुणंप्रभुं॥तपतांद्यु
मतांसूर्यंमनुष्याणांचभूमिपं॥१७॥टीका॥भक्तिप्रतापेंअ
तिअगाध॥तोमीदैत्यामाजिप्रल्हाद॥नक्षत्रऔषधीचा
मीचंद्र॥तोमीम्हणेगोविंदस्वरूपमाझें॥८०॥यक्षराक्षसा
माजिथोर॥मीचिस्वरूपतोकुबेर॥ज्याचेविश्वासिनिरं
तर॥असेभांडारलक्ष्मीचे॥८१॥ऐरावतजोगजेंद्र॥तोमी
म्हणेयादवेंद्र॥वरुणजळाचाराजेंद्र॥तोमीम्हणेउ
पेंद्रस्वरूपमाझें॥८२॥स्वप्रभाप्रकाशनीय॥जगप्रका ॥२०

शनीउदय॥तोसूर्यम्हणेमीवैकुंठ॥अतितीखटनिजतेजें॥८३
॥मनुष्यामाजिजेभोगीक्षिति॥सार्वभौमज्याचेहाती॥त्यातें
चिबोलिजेभुपती॥तोमाझीविभूतीहरिम्हणे॥८४॥श्लोक॥उच्चै
श्रवास्तुरंगाणांधातूनामस्मिकांचनं॥यमःसंयमतांचा
हंसर्पाणामस्मिवासुकिः॥१८॥नागेंद्राणामनंतोहंमृगें
द्रःश्टंगिदंष्ट्रिणां॥आश्रमाणामहंतुर्योवर्णानांप्रथ
मोऽनघ॥१९॥टीका॥उच्चैश्रवातुरंगजाती॥तोमीम्हणे
एकमलापती॥सुवर्णधातुमाजिविभूति॥जीलागी
लुब्धपातीतिन्हीलोक॥८५॥दंडधरयमाजिगहन॥ये

॥२१॥ सधर्ममां आपएं ॥ सर्पमा जिमीनारायण ॥ मी आपएं वासुकी
॥८७॥ श्लो० तया नामा तेजोधरी ॥ तोमी नागल्लएं श्रीहरी ॥
नरखंदं छत्राश्टंगधारी ॥ त्यामाजी केसरी ल्लएं देवा ॥ ८८ ॥ च
तुर्थाश्रमसन्यास जाणे ॥ तो आश्रममी नारायेण ॥ वर्एं जे
ब्राह्मण ॥ तें ब्रह्मंमी बोलतें ॥ ८९ ॥ श्लोक ॥ तीर्थनां श्रोत
सांगंगा समुद्रः सरसामहं ॥ आयुधानां धनुरहं त्रिपुर
घ्नो धनुष्मतां ॥ २० ॥ टीका ॥ तीर्थसरितामाजिं गंगा ॥ तेमी
ल्लएं श्रीरंगा ॥ तडागश्रेष्ठ तमहागा ॥ समुद्र ग्रामी ल्लएं ॥२१॥
हरी ॥ ९० ॥ आयुधीधनुष्यहं ॥ तोयेरु ॥ तेंमी ल्लएं शारंग

धरु ॥ दुर्गमलें अतिदुर्धरु ॥ तिएं केला संहारु त्रीपुराचा ॥
९१ ॥ श्लोक ॥ धिष्ण्यानाम स्यपहंमेरु र्गहि नानां हिमालयः ॥
वनस्पतीनामश्वत्थ औषधीनामहंयवः ॥ २१ ॥ टीका ॥ त्रिभुव
नीवासस्थान मेरु तोमी ल्लएं धराधरु ॥ दुर्गमलें अति
दुर्धरु ॥ तो हिमाली गिरु ल्लएं एकरूप ॥ ९२ ॥ वृक्षामाजि अ
श्वत्थ ॥ तोमी ल्लएं श्रीकृष्णनाथ ॥ औषधीमाजि अतिवी
ख्यात ॥ येवमी अच्युत ल्लएं वैग ॥ ९३ ॥ श्लोक ॥ पुरोधसां
वशिष्टोमहं ब्राह्मिष्टानां ब्रहस्पतिः ॥ स्कंधोहं सर्वसे
न्यानांमग्रएंदा भगवानजः ॥ २२ ॥ टीका ॥ श्रीरामपुरोहित

भा०१०

॥२२॥ श्रेष्ट॥ देवल्लएतेोंमी वशिष्ट॥ वेदवक्तामाजिवरीष्ट॥ सुरगुरुतउद्ग
टउद्धवा॥ १९४॥ स्कंधसेनापत्ती शिरोमणी॥ तोंमीह्लएचक्रपाणी
॥ स्वधर्मप्रवर्त्तकुमीआग्रणी॥ वंद्यब्राह्लणीतोब्रह्ला॥ १९५॥ श्लो
क॥ यज्ञानांब्रह्लयज्ञोहंव्रतानामविहिंसनं॥ वाद्यस्पर्कांबुवा
गात्मास्तुचीनामप्पुरुस्तु चि॥ २३॥ टीका॥ यज्ञामांजिब्रह्लये
ज्ञ॥ तोमीह्लएसर्वज्ञ॥ देवर्षिपित्रुभुतगणएं॥ आब्रह्लभुवन
जेथेवृत्ती॥ १९६॥ जीवमात्रासीजाएं॥ नेंदावेंदुःखवचन॥
व्रतामाजिजेवीअहिंसन॥ तोमीश्रीकृह्लस्वयेंह्लएं॥ १९७
॥ येकावायुत्वेनपवित्रपणें॥ येकेअग्नीस्त्तवपवित्रजा ॥२२॥

ण॥ येकापवित्रकरीजीवन॥ येएंपावनवचनमात्रें॥ १९८॥ येक
बुद्धीस्त्तवपावनं॥ यासंस्त्रामाजीपवित्रपणे॥ तेंमाझेंस्वरूपह्ल
एंश्रीकृह्ल॥ पावनांपावनमीयेक॥ १९९॥ जगज्याचेनिनामेंपु
नीत॥ हेसर्वांसिर्वसंमत॥ तेंमाझेंस्वरूपजेंयेथ॥ परमपुनीतपु
नीता॥ २००॥ श्लोक॥ योगानामात्मसंरोधो मंत्रोस्मि विजिगीष
तां॥ आन्वीक्षिकीकौशलानांविकल्पःख्यातिवादिनां॥ २४॥ टीका
॥ विविधयागामाजिआत्मरोधु॥ तोयोगह्लएमीगोविंद॥
जेएंप्रगटेपरमानंद॥ समाधिबोधुसाधका॥ २०१॥ मुख्यत्वेवि
वेकधरूनिहाती॥ जोन्यायत्ताविषयवांछीचित्ती॥ तेनीती

...०९०

॥२३॥ चीनीति मी श्रीपति ॥ जाण निश्चिती उद्धवा ॥२॥ आत्मानात्मवि
वेक केवळ ॥ ते आन्वीक्षिविद्या कुशळ ॥ ते मी ह्मणे गोपाळ ॥ विवे
कप्रबळी माझेनि ॥३॥ विद्यामाजि वाद अनंत ॥ येथे विकसा
सी नाही अंत ॥ तो वाद मी ह्मणे अच्युत ॥ एक निश्चीत विकस
॥ आख्याती अन्यथाख्याती ॥ शून्यख्याती सर्वख्याती ॥ अनि
र्वचनीये जे ख्याती ॥ तो वाद निश्चिती मी उद्धवा ॥४॥ श्लोक ॥
स्त्रीणां तु शतरूपाहं पुंसां स्वायंभुवो मनुः ॥ नारायणो मुनी
नां च कुमारो ब्रह्मचारिणां ॥२५॥ टीका ॥ शतरूपा आणी म
नु ॥ पैं दोन्ही मी ह्मणे जनार्दन ॥ मुनीमाजि मी नारायण बद ॥२३

रीसी येउनी सदा वसे ॥६॥ नैष्टिक ब्रह्मचर्य धर ॥ माझें स्वरू
प सनत्कुमार स्वयें सांगता हे श्रीवर ॥ जाण साचार उद्धवा ॥
७ ॥ श्लोक ॥ धर्माणामस्मि संन्यासः क्षेमाणामबहिर्मतिः ॥ गुह्या
नां सूनृतं मौनं मिथुनानामजस्त्वहं ॥२६॥ टीका ॥ भूत अभये दान उ
पक्रम ॥ सर्व भूती मी आत्माराम ॥ हा संन्यासाचा मुख्य धर्म ॥ तो ध
र्म पुरुषोत्तम स्वयें मी ह्मणे ॥८॥ भूतांसी कायावाचामने ॥ दुःख
ने दुनी सुख देणे ॥ या नाव संन्यासधर्म ह्मणे ॥ तो धर्म बांनने मी पा
श्रीवरो ॥९॥ अंतरी शुद्ध नाही बोध ॥ दांत चाउनी साहातां खें
द ॥ ते क्षमा न कोंडे शुद्ध ॥ येक विनोद क्षमेचा ॥१०॥ अंतरी गसाव

जेंपरब्रह्म॥बाह्यसर्वभुतांजालासम॥तेंक्षमामीह्मणेंपुरु
षोत्तमुह्मदत्र्यारामबाधीनां॥११॥असत्यपापेंसकळसृष्टी
॥असत्यामाजिपापकोटी॥त्याअसत्याचीखोटीगोठी॥
जोतीपोटीसोडीना॥१२॥उभयलोकिकींखोटेंपण॥अ
सत्यबाहेरीमुद्रेनाएं॥तेंमनीहुनीजेंसांडणें॥तोमी
श्रीकृष्णेंवंदीजे॥१३॥गुह्यामाजिअतिगुह्यजाण॥सत्यव
चाकींमनीहुनीमौन॥तोमीह्मणेंमधुसूदन॥सत्यत्रि
यजाणनिजगुह्य॥१४॥श्रेष्ठाचेदेहद्विधाजाण॥मनुश ॥२४
तरूपामुळमिथुन॥तेंमीह्मणेंनारायेण॥मनुश्रेष्ठजनि

निजबोधें॥१५॥श्लोक॥संवत्सरोऽस्म्यनिमिषामृतूनांमधुमाधवौ॥
मासानांमार्गशीर्षोहंनक्षत्राणांतथाभिजित्॥२७॥टीका॥
सावधानेंअविकळ॥नचुकतापळेंपळ॥संवत्सरात्मजोका
ळ तोमीगोपाळस्वयेंह्मणें॥१६॥त्रसरेणुपासुनीजाण॥ल
वनीमिषदिनमान॥संवत्सरवरीसावधान॥गणेंमीसंक
र्षणेकाळगणना॥१७॥मधुमाधववसंतयुक्त॥ऋतुह्म
णेंमीतोऋतु॥मार्गसीरुमीमासांआंत॥जोधान्यपीकांत
अल्हाद॥१८॥गणितांनयेपंचांगांत॥नक्षत्रीअसोनिसदा
गुप्त॥अपरूपरीसज्ञानप्राप्त॥तोमीअभिजितह्मणें

हरी ॥१९॥ श्लोक ॥ अहंयुगानां च कृतं धीराणां देवलोसितः ॥ द्वै
पायनोस्मि व्यासानां कवीनां काव्य आत्मवान् ॥२८॥ टीका ॥ युगा
माजि कृतयुग ॥ तो मी ह्मणे श्रीरंग ॥ जेथें संपूर्ण धर्म सांग ॥ अध
र्मभाग असेना ॥२०॥ निज धैर्यें अति अद्भुत ॥ असित देवल धैर्य
वंत ॥ तो मी ह्मणे अच्युत ॥ जाण निश्चित उद्धवा ॥२१॥ वेदकवि भागी
राजहंस ॥ जो कां द्वैपायन व्यास ॥ तो मी ह्मणे हृषीकेश ॥ निव
डुनि वेद जासदी धल्ले वेद ॥२२॥ कविला माजि परमार्थ ज्ञाता ॥
तो मी ह्मणे रमाभर्ता ॥ मुषनी कवी जाण तत्वता ॥ निजात्मक
विता मी शुक्र ॥२३॥ श्लोक ॥ वासुदेवो भगवतां त्वं तु भागव ॥२५
तेष्वहं ॥ किंपुरुषाणां तु हनुमान् विद्याध्राणां सुदर्शनः ॥

२९ ॥ टीका ॥ षड्गुण भाग्ये भाग्यवंतु ॥ पूर्णांशीं जो भगवंतु ॥ वा
सुदेव नामें विख्यातु ॥ जाण तो मी येथ श्रीकृष्ण ॥२४॥ भाग
वतां माजि अति गहन ॥ उद्धवा तो तुं मी ची जाण ॥ ऐसें बोल
तां श्रीकृष्ण ॥ उद्धवें श्रीकृष्ण वंदिला ॥२५॥ उद्धवें करितां नमन ॥
कृष्णें दाधलें आलिंगण ॥ आनंदें कोंदलें त्रिभुवन ॥ स्वानंद
घन तुष्टला ॥२६॥ उद्धव आणि श्रीकृष्ण ॥ दोन्ही येक जाले
जाण ॥ मी तो तुं ज बोलिला श्रीकृष्ण ॥ तें उद्धवासी आपण
सत्य केलें दावी ॥२७॥ दोघांचें मोडिलें दोनीपण ॥ उद्धव जाला
श्रीकृष्ण ॥ कृष्णा आंगीं उद्धवपण ॥ संपूर्ण जाण बाणलें ॥२८

तेणें उद्धवजा त्या विस्मीत । नावें कश्या घेत्या आपण्यां त । मी
चीं कृष्णाचा पूर्ण भक्त । हें जाणोनि पूर्ण बोलिला ॥ २९ ॥ वानरा
माजि जो हनुमंत । तो मी ल्हणे श्रीकृष्णनाथ । तवं उद्धवाजा
गा गर्व हृत । नाजी त्या पोटां ततेकाळीं ॥ ३० ॥ तेथें वानरम्हणणे
वचन । मज हुनी कृष्णाचा प्रीयेकर । न कळे हरि भक्तांचा
पार । मी कोण कीं कर तेठाईं ॥ ३१ ॥ ऐसें विचारु निवी
ला । सर्वेचि नमीलें श्रीकृष्णनाथा । तुझ्या विभुती अ
चुंबिता । कृपें ऐंतलत्ता भजसांग ॥ ३२ ॥ तवं हांसोनि
या श्रीधर । काय बोलिला उत्तर । सुदर्शन जो विद्या 

धर । तो विभूति साचार पैं माझी ॥ ३३ ॥ श्लोक । रत्नानां
पद्मरागोऽस्मि पद्मकोशः सुपेशसां । कुशोऽस्मि दर्भ
जातीनां गव्यमाज्यं हविःष्वहं ॥ ३० ॥ टीका । रत्नामाजि जो
पद्मराग । तो मी ल्हणे श्रीरंग । मनोहरामाजि अव्यं
ग । हरी ल्हणे सांग पद्मकळा तो मी ॥ ३४ ॥ दशा दर्भामा
सारी । कुश तो मी ल्हणे हरी । सकळ हविशांचे सिरीं
॥ गोघृत श्री हरी मी ल्हणे ॥ ३५ ॥ श्लोक ॥ व्यवसायि
नामहं लक्ष्मीः कितवानां छलग्रहः ॥ तितिक्षास्मि

तितिक्षुणांसत्वंसत्ववतामहं ॥३१॥ टीका ॥ अवसा
येविवेकस्थिती ॥ दानदेतानसरेसंपत्ती ॥ तेलक्ष्मी
मीह्मणेश्रीपति ॥ जाणनिश्चिती उद्धवा ॥ २६ ॥ क
पटाचीयेकपटगती ॥ अगम्यजेछळणस्थिती ॥
तेमीकल्पमाईकमुर्त्ती ॥ अतर्क्ययुक्तीछळनांची
॥ २७ ॥ ब्रह्माचेअंगीआणिजीविता ॥ जीवासी
ब्रह्मसायुज्यता ॥ त्याकपटासीमीचीकर्त्ता ॥ दे 

वादेवतांअतर्क्य ॥ २८ ॥ आह्मीमायानियंतेह्मणवी
ति ॥ तोशिवठकीलामोहनीव्रति ॥ ब्रह्मांठकीलाव
छाथीं ॥ मकडानिश्चितीमीयेक ॥ २९ ॥ सहनशीळा
सहनशक्ति ॥ तोमीह्मणेएकमल्हापति ॥ सात्विकाची
निजसत्ववृत्ती ॥ तेमीश्रीपतिस्वयेंह्मणे ॥ ३० ॥ श्लोक ॥
ओजःसहोबलवताकर्माहंविद्धिसात्वतां ॥ सात्व
तांनवमूर्त्तीनामादिमूर्त्तिरहंपरा ॥ ३२ ॥ टीका ॥ ब
लवंताच्याठाईत्रबळ ॥ मनोबळशरीरबळ ॥ धैर्य

ना०ए० । व्यासें करूनि भक्ती ॥ वेदव्यासपदप्राप्ती ॥ हे केली ।
॥२८॥ बळते मी गोपाळ ॥ जेणें अणुमात्र डंडली नां ॥
४१ ॥ भक्ताचा ठाई भजन कर्म ॥ जेणें माझें अनिवार प्रेम
॥ ते कर्म मी ल्लंणें पुरुषोत्तम ॥ भक्ता काम निर्दळण ॥ ४२ ॥ न
वम हु अर्चनास्थिती ॥ सा लत्ता ज्या नव मूर्ती ॥ त्यातु वासु
देव प्रथम स्थिती । आदि कविसत्ती नावांची ॥ ४३ ॥ वासुदेव
संकर्षण ॥ अनिरुद्ध आणि प्रद्युम्न ॥ हयग्रीव नारायण ॥
वाराह वामन नरसिंह ॥ ४४ ॥ हे नव ईहुची विसत्ती ॥ या
माजि प्रथम मूर्ती ॥ ये स्माठार हा माझ्या विभुती ॥ जाणे निश्चि ।२८
ती उद्धवा ॥ ४५ ॥ हयग्रीव वेद मूर्ती । तेथ अग्रीख्याती निहिला

की ॥ ४६ ॥ नारायण निजमूर्ती ॥ श्री श्रेष्ठे नेकरूनि त्याचि भक्ती ॥ च
तुश्लोकीची ज्ञानस्थिती । पावोनी निश्चिती ब्रह्मत्वा आली ॥ ४७ ॥
श्वेत वराह महामुर्ती ॥ धरेने केली पूर्ण भक्ती ॥ तिसी उद्धरनी कृ
पामुर्ती ॥ अभिनव शांति अर्थिली ॥ ४८ ॥ माझी निजमूर्ति वा
मन । देव करूनि पूर्ण भजन ॥ याचे निळ्के बळी बाधोन ॥ देव
चा सन्मानस्वाधिकारी केला ॥ ४९ ॥ नरहरी दिव्य मुर्ती ॥
प्रल्हादाची अनन्य भक्ती ॥ मी सर्वात्मा सर्व मुर्ती ॥ हि लोक प्र
तीति विश्वासी ली जेणे ॥ ५० ॥ संकर्षण श्रेष्ठ मूर्ती ॥ ब्रह्मज्ञा
रेवते केली भक्ती ॥ अर्पूनियां रेवती स्वानंदस्थिती निवाला ॥

भा०ए०
॥२९॥

॥ प्रद्युम्नकामभूर्त्ती ॥ सकामकामीकरूनीभक्ती ॥ जेजेकामाते
वांछिती ॥ तेतेमिश्चिती तोपूरवी ॥ ५२ ॥ अनिरूद्धमाझा निजस
खा ॥ सिवाझा भक्तिकेलीउखा ॥ बाणासुरतारिलादेखा ॥ सा
धुचित्ररेखानादारनुझा ॥ ५३ ॥ पूर्णांशीब्रह्मस्थिती ॥ वासु
देवोमीआदिमुर्त्ती ॥ लीलेनितारिलेनेणोकीती ॥ तेथीलनि
जभक्तिउद्धवाअर्जुनानांदे ॥ ५४ ॥ नवभक्तनवमुर्त्ती ॥ तेथी
लभक्तिचीनिजस्थिती ॥ उद्धवाम्यांतुजप्रती ॥ यथार्थगती
सांगीतली ॥ ५५ ॥ श्लोक ॥ विश्वावसुःपूर्वचित्तिर्गंधर्वाप्स
रसामहं ॥ भूधराणामहंस्थैर्यंगंधमात्रमहंभुवः ॥ २७ ॥ टीका ॥ २९

॥ ज्याचेगायनअतिअपूर्व ॥ जोविश्वावसुगंधर्व ॥ तोमीम्हणेमा
धव ॥ एकसावधउद्धवा ॥ ५६ ॥ नृत्यकरूनिमनोहर ॥ स्वभावेस
दासुंदर ॥ उर्वसीतेजेअप्सरा ॥ तेमीम्हणेनवराभीमकीचा ॥ ५७
॥ पर्वतामाजिस्थैर्यपण ॥ तेमीम्हणेनारायण ॥ पृथ्वीमाजिंजो
गंधजाण ॥ तोमीश्रीकृष्णस्वयेम्हणे ॥ ५८ ॥ श्लोक ॥ अपांरस
श्चपरमस्तेजिष्ठानांविभावसुः ॥ प्रभासूर्येंदुताराणांशब्दोहं
नभसःपरः ॥ २८ ॥ टीका ॥ उदकाच्याठाईंसुरस ॥ तोमीम्ह २
णेश्रीनिवास ॥ तेजिष्टामाजिजोप्रकाश ॥ तोमीनिजते
जउद्धवा ॥ ५९ ॥ चंद्रसूर्यतारांचाठाईं ॥ तेतेजतेमाझे

पाहि ॥ अनुहत [illegible]द तोही ॥ तो गगनासी कहीं नातळे ॥ ६०॥
श्लोक ॥ ब्रह्मण्यानां बलिरहं वीराणामहमर्जुनः ॥ भूतानां स्थि
तिरुत्पत्तिरहं वै प्रतिसंक्रमः ॥ २५ ॥ टीका ॥ ब्राह्मणभजने ब
ळीची थोरी ॥ तो मी कृष्ण म्हणे निर्धारी ॥ ब्राह्मणपूजनप्रतापें
करी ॥ मी बळीच्या द्वारी द्वारपाळ ॥ ६१ ॥ नरावतार अतीसंप
न्न ॥ पांडवामाजि वीर अर्जुन ॥ तो मी म्हणे नारायेण ॥ जीव
प्राण तो माझा ॥ ६२ ॥ भूताची उत्पत्ती स्थिती ॥ ते मी म्हणे गा
श्रीपति ॥ भुतासी जे प्रळयगती ॥ तेही मी निश्चिती उद्धवा ॥
६३ ॥ श्लोक ॥ गत्युत्सर्गोपादानमानंदस्पर्शलक्षणः ॥ आ

स्वादश्रुत्यवघ्राणमहं सर्वेंद्रियेंद्रियं ॥ २६ ॥ टीका ॥ ज्ञानकर्म उभ
येंद्रियें ॥ त्या इंद्रियाची मी इंद्रियें ॥ पाहे त्याची क्रिया जे जे आ
हे ॥ ते माझेनि होये अभिव्यक्त ॥ ६४ ॥ गती ग्रहण गमन ॥ उत्सर्ग
आणी मोह ॥ दर्शन स्पर्शन घ्राण ॥ श्रवण स्वादन माझेनि ॥
६५ ॥ येंद्रियक्रियेचे चळण ॥ तिळभरी न के मजविण ॥ एक
याचेही लक्षण ॥ तुज मी संपूर्ण सांगेन ॥ ६६ ॥ मी मनाचे म
न मन ॥ नयनाचेंही नयन ॥ स्पर्शाचे स्पर्शन ॥ जिव्हेची जि
व्हा ॥ ६७ ॥ मी घ्राणाचे निज घ्राण ॥ श्रवणाचे आदी श्रव
ण ॥ ग्रहण चे [illegible] ग्रहण ॥ गतीची मि गति ॥ ६८ ॥ मी आ

भा०५०

॥३१॥

नंदाचा आनंदु ॥ मी बुद्धीचा हो बोधु ॥ सकळ इंद्रियांचा स्वादु ॥
तो मी मुकुंद उद्धवा ॥ ६९ ॥ मी वाचेची वाचा सावकाश ॥ मी परे
चा हो परेश ॥ सकळ इंद्रियांचा मी ईश ॥ याला गा हृषीकेश ना
म माझें ॥ ७० ॥ श्लोक ॥ पृथिवी वायुराकाशमापो ज्योतिरहं
महान् ॥ विकारः पुरुषोऽव्यक्तं रजः सत्त्वं तमः परं ॥ ३७ ॥ टीका
॥ तत्त्वसंख्या पंचवीस ॥ त्रिगुण घालिता अगवीस ॥ एक
त्याचा हो विलास ॥ सावकाश सांगेन ॥ ७१ ॥ अहं महत्तत्त्व पं
चतन्मात्रा ॥ हा स्थूळ प्रकृतीचा उभारा ॥ महाभूत इंद्रियें
अकरा ॥ हे षोडश विकारांची संख्या ॥ ७२ ॥ त्यातु मिळावया ॥३१॥

प्रकृती पुरुष ॥ तत्त्वसंख्या पंचवीस ॥ प्रकृतीमाजि गुणांचा
वास ॥ हा तत्त्वविन्यास तत्त्वांचा ॥ ७३ ॥ प्रकृती गुण विकारें तत्त्व
संख्या ॥ निर्धारिली सांगीतली जो विचार ॥ ते परात्पर स्वरूप
माझें ॥ ७४ ॥ श्लोक ॥ अहमेतत्प्रसंख्यानं ज्ञानं तत्त्वविनिश्चयः
॥ मयेश्वरेण जीवेन गुणेन गुणिना विना ॥ ३८ ॥ सर्वात्मनापि
सर्वेण न भावो विद्यते क्वचित् ॥ टीका ॥ येवं पंचवीस तत्त्व सं
ख्यान ॥ ते अवघेंची मी जाण ॥ या गुण त्यांचें गणि ते ज्ञान ॥ ते
हि मी आपण उद्धवा ॥ ७५ ॥ हि हिं जाणनें लक्षण ॥ तें ही
द्वोल्लणें मी आपण ॥ मज वेगळें आण प्रमाण ॥ सर्वथा ना

ण असेना ॥ ७६ ॥ जीव आणी ईश्वर ॥ गुणी आणी गुणावतार ॥
क्षेत्र क्षेत्रज्ञ निर्धार ॥ सर्व ही साचार मी चिन्मी ॥ ७७ ॥ मज वेगळे
गा अणुमात्र । उरलें नाहीं गा स्वतंत्र ॥ मी सर्वात्मा सर्वी स्वतं
त्र केवळ चिन्मात्र तो ही मी ॥ ७८ ॥ मज वेगळें येथें कांही ॥ उद्ध
वा गा उरलें नाही ॥ सर्व साधारण पाही ॥ सर्व देही मी असे
॥ ७९ ॥ उद्धवा येथे पाही ॥ संक्षेपुन करावा कांही ॥ विस्तार न
चले ते ठाई ॥ एक तें ही सांगेन ॥ ८० ॥ श्लोक ॥ संख्यानं परमा
णूनां कालेन क्रियते मया ॥ ३९ ॥ तथा न मद्विभूतीनां सृज
तोंडानि कोटिशः ॥ टीका ॥ पृथ्वीचीं परमाणु कणें ॥ मी सकळ ॥ ३२ ॥
या

रूपें करी गणणें ॥ परि विभूति संख्या प्रमाण ॥ माझें न ही
जाणें न गणवती ॥ ८१ ॥ म्या सृजीलें अनंत ब्रह्मांडें ॥ ते मज
गणवती ना सकळ ॥ मा विभूती माझ्या केवळ ॥ कोण तोंड
ळ गणुं सके ॥ ८२ ॥ मी सर्वज्ञ श्रीनारायेण ॥ माझ्या विभूती म
ज जाण ॥ गणवेना ही आगवण ॥ मां निरोपण कोण सांगे
॥ ८३ ॥ मनुष्यामाजि माझी विभूति ॥ नांदतसे कोणे स्थिति ॥
ते गुण सांगेन तुज प्रती ॥ एक निश्चिती उद्धवा ॥ ८४ ॥ श्लोक
॥ तेजः श्रीः कीर्तिरैश्वर्यं ह्रीस्त्यागः सौभगं भगः ॥ ४० ॥ वीर्यं
तितिक्षा विज्ञानं यत्र यत्र स मेंऽशकः ॥ टीका ॥ ज्यासी प्रबळ प्र
तापशक्ती ॥ ज्यासी निरंतर लक्ष्मीची वस्ती ॥ ज्यासी मर्यादा न

गी०ए०

॥३२ हीसंपत्ती॥ज्याचीउदारकीर्त्तीस्वधर्मी॥८५॥ज्याच्याऐश्वर्याची
परमगती॥आज्ञेवरीनमीत्रिजगती॥ज्यासीअनंतव्रतदान
स्थिती॥तेथभाग्यांचीउत्पत्तीनिश्चनवीदासे॥८६॥ज्याचेसा
मर्थ्यअतिदुर्धर॥कोणीबोलोंनशकेउत्तर॥ज्याचेसौभाग्यम
नोहर॥अल्हादकरजननयनां॥८७॥त्यासीसहनशीळ
तेचीवोज॥ज्यासीनिंद्यकर्माचीलाज॥जोविज्ञानाचेभोज
॥सहजनिजनाचतु॥८८॥येंलक्षणेंजेथेंवर्तती॥तेजाण
माझीविभूती॥यांतुयेक्यालक्षणाचीप्राप्ती॥तेहीविभूतीपै
माझी॥८९॥श्लोक॥एतास्तेकीर्तिताःसर्वाःसंक्षेपेण ॥३२

विभूतयः॥४१॥मनोविकाराएवैतेयथावाचाविधीयते॥टीका
॥केवळसंकोचसंक्षेपस्थिती॥म्यासांगीतल्याज्याविभूती
॥त्यामनोविकारप्रतीति॥जाणनिश्चितीउद्धवा॥९०॥सा
धकांचेंसाधनस्थिती॥सत्यजाणमाझ्याविभूती॥वि
चारितांपरमार्थगती॥तरियाकल्पितीमनोजन्या॥९१॥माझें
स्वरूपअद्वैतजाण॥नाहीनामरूपगुणवर्ण॥जेथेंनानांवि
भूतीलक्षण॥मिथ्याजाणवाचिका॥९२॥श्लोक॥वाचंयच्छम
नोयच्छप्राणंयच्छेंद्रियाणिच॥४२॥आत्मानमात्मनायच्छन
भूयःकल्पसेध्वने॥टीका॥माझेंस्वरूपनित्यनिर्वीकार॥मनबु

॥३४॥ द्धीवाचानकळेपार।तेथेइंद्रियेंबापुडीकींकरा।प्राणनिर्द्धारिते
नऐ॥९३॥याल्लागीशमदमाचाअनुक्रमी।मनबुद्धीवाचाइंद्रिय
नेमी।प्राणनेमुनीप्राणधर्मी॥आत्मारामीपावसी॥९४॥मनबु
द्ध्यादिइंद्रियनेम।कळाव्याचेनकेलेवर्म।ह्मणसीतरीतोअ
नुक्रम।एकसुगमसांगेन॥९५॥वाचानेमावीमाझेनिनावें
॥मननेमावेंध्यानसंभ्रमें।प्राणनेमावाप्राणायामें।इंद्रियें
दमनेंनेमावी॥९६॥बुद्धिनेमावीआत्मविवेकें॥जीवनेमा
वापरमात्मसुखें।इतुकेनतुंअवश्यकें।होसीकवतीकेंम
द्रूप॥९७॥मद्रूपजालयांपाठीं।संसाराचीनपडेदाठी॥ 

खुटल्याजन्ममरणांच्यागोठी।गमनआटाटीनिमाली।९८।म्यां
सांगीतल्यानेमपरीपाटी।हानेमकरणेंनाहीज्याच्यापोटीं॥
तोभोगीदुखाचीयाकोटी।एकतेगोठीसांगेन॥९९॥श्लो
क।योवैवाङ्मनसीसम्यक्संयच्छतिधियायतिः॥४३॥तस्यव्र
तंतपोज्ञानंस्रवत्यामघटांबुवत्॥टीका॥म्यांसांगीतलेंने
माचेनिगुती।मनबुद्धीइंद्रियपंक्ती॥जोनेमीनासाक्षेपवृ
ती॥त्यासीसाधनेंहोतीनश्वर॥१००॥त्याचेंव्रततपदान॥
योगयागशब्दज्ञान।काचाभांडांजेवींजीवन।तैसींजा
एनासती॥१जेवीराखमाजीकेलाहोम॥कांअश्रोचा

ना०ए०

॥३५॥ श्री

आचरणाकर्म ॥ कुपात्रीं दान धर्म ॥ तैसा संभ्रम साधनां ॥
२ ॥ उखरि पेरीले बीज ॥ कां गोळ्यकी अवती लेपीज ॥ डोहळया
चे सोहळे भोगी वांझ ॥ त्याचि साधनें तैसी वोज साधनां ॥ ३
॥ यापरी गा निश्चिती ॥ विधियुक्त नेम मांहो चित्तीं ॥ याचीं
साधनें वृथा जाती ॥ होतो हातें उद्धवा ॥ ४ ॥ पालागी मना दि
इंद्रिय वृत्ती ॥ नेमावया येथा नीगुती ॥ हे चित्त उद्धवा प्रति
॥ पुनःपुना सांगतुं ॥ ५ ॥ श्लोक ॥ तस्माद्वचो मनः प्राणान्नि
यच्छन्मत्परायणः ॥ मद्भक्तियुक्तया बुद्ध्या ततः परिसमा ॥३५॥
प्यते ॥ ४४ ॥ टीका ॥ मन बुद्धि इंद्रिय प्राण ॥ अवश्य नेमावे

गा जाण ॥ हे ति करूनी सावधान ॥ माझें भजन जो करी ॥ ६ ॥ भा
वें करितां माझी भक्ती ॥ विषयवासना जळोन जाती ॥ निर्वि
कल्प तप जे शांति ॥ माझे भक्ती पंथी चालतां ॥ ७ ॥ चालतां
माझे भक्ती पंथी ॥ सकळ साधनें लाजो निजाती ॥ भावें प्र
गटो निश्रीपति ॥ करी संसारनिवृत्ती निजभक्तां ॥ ८ ॥ हे कां
माझ्या निजभक्तां ॥ संसार बाधे चि वेथा ॥ ते लाज मज भग
वंता ॥ गां जुंनी जभक्तां मी निंदीं ॥ ९ ॥ प्रल्हाद गांजितां जे
टां जेठी ॥ मी प्रगटलो कोरडे काष्टीं ॥ वैकुंठ सांडुनी उठा
उठी ॥ राजेंद्रा साटीं पावलों ॥ १० ॥ द्रौपदी गांजितां तत्काळीं ॥

भा०९०

॥३६॥ त्यां कौरवांची तोडें केली काळी ॥ आगि नेजाळीतां गोवळी ॥ त्यां
ग्रासिला ते काळी दावाग्नी ॥ ११ ॥ गोकुळ गांजितां सुरपती ॥
त्यां गोवर्द्धन धरिला होता ॥ गोपिकांची पुरवी आर्ती ॥
मीं जालों श्रीपति कामारा ॥ १२ ॥ अर्जुन प्रतिज्ञेची प्राप्ती ॥
त्यां दिवसा चि लपविला गभस्ती ॥ जाउनी जयद्रथासी खा
ती ॥ सुभद्रापति वांचविला ॥ १३ ॥ अंबरुषीचे गर्भवासा ॥ त्यां
चि सोसिले सावकाश ॥ उणें आपुल्या भक्तांस ॥ मी हृषीके
श येवों नेंदी ॥ १४ ॥ भक्तांची पांईची माती ॥ मी हृदईं वाहे श्री
पती ॥ वानरें वनचरें भावार्थी ॥ त्यां आपुले भक्ती बैसविली ॥ ॥३६

१५ ॥ यालागीं उद्धवा पुढत पुढती ॥ संग करावी माझी भक्ती ॥
माझे भजन प्राप्ती ॥ अवलीला पावती मद्भावें ॥ १६ ॥ मद्भावें क
रितां माझी भक्त ॥ मी अनंत आतुडे त्यांचे हातीं ॥ सेखी का
मारा होय भक्ता प्रती ॥ भक्तिची प्रीति मज ऐसी ॥ १७ ॥ माझी ये
भक्ती परतें ॥ सुगम साधन ना ही येथें ॥ हे विजाणोनि यां तुतें
॥ भजन पंथें लाविलें ॥ १८ ॥ नाविल्यां लाठाजे सद्भक्ति ॥ तिथें सं
सारबा पुडें किती ॥ हिव्हसुनी च्या रही मूक्ति ॥ निजसुख भो
गिती मद्भक्त ॥ १९ ॥ मद्भक्तांचें महिमान ॥ अतिशयें अगम्य
गहन ॥ ऐसें बोलिलो नी यां श्री कृष्ण ॥ उधवा आपण कुरवा

॥ ३७ ॥ नी ॥ २० ॥ तेणें कृष्णकराग्रस्पर्शें ॥ उद्धवासी होजालें कैसें
॥ व्यालें धेनूचेनी वोरसें ॥ वत्स जैसें उल्हासे ॥ २१ ॥ जेवीं ला
गतां चंद्रकर ॥ सबाह्य निवों लागे चकोर ॥ मेघ देखोनि म
यूर ॥ नृत्यतत्पर स्वानंदें ॥ २२ ॥ यापरी उद्धवा जाण ॥ स्वानंदें
जाला परिपूर्ण ॥ विसरला देवभक्तपण ॥ कृष्णपण विस
रला ॥ २३ ॥ यापरी भक्तसुखाक्रांत ॥ दोघे येकें जालेंती उन्मत्त
॥ परमानंदाचा तेथें उडानाचत स्वानंदें ॥ २४ ॥ भक्तीसु
खाची गोडी ॥ भाग्येंविण न कळे फुडी ॥ उद्धवभजनांची
कुणवाडी ॥ जोडीला जोडी श्रीकृष्ण ॥ २५ ॥ येकाजना ॥ ३

र्दनाशरण ॥ भजनसुखाची उणखुण ॥ तो येकु जाण ऐसें संपू
र्ण ॥ भक्तिजीवनजीकाळी ॥ २६ ॥ जो निजभक्तीचाजीका
ळा ॥ तो गोकुळीं अवतरोनि गोवळा ॥ क्रीडे नित्याचिया
खेळमेळा ॥ गोपीगोपाळां उद्धरीलें ॥ २७ ॥ स्वयें खेळोनि
त्यासी खेळा ॥ उद्धरिलें गोपाळां ॥ हिनवलरुत्याचीक
ळा ॥ उद्धरली ज्या तेयेका ॥ २८ ॥ पर्वत पाषाण तृण तरुव
र ॥ भृंग मृग मछ मगर ॥ माधुवनचर वीखार ॥ पारापते
मयूर आदिकरूनी ॥ २९ ॥ येणेंसी समवेत ॥ गोकुळी
चे जीव समस्त ॥ स्वयें उद्धरी श्रीकृष्णनाथ ॥ कृपाळु स

॥२८॥ मर्थस्वलीला ॥३०॥ कांपित्र्यवचनेंपुढारा ॥ सीतेचीयावियो
गधारा ॥ रीसा आणीवानरां ॥ उद्धरीनीशाचरां रघुनाथु ॥
३१ ॥ सेवेनेंतरलेरीछवानरा ॥ युद्धेंतरलेनिशाचरा ॥ हेनव
लनकेकाळीथोर ॥ येकउद्धारलीजात्याची ॥ ३२ ॥ अयोध्ये
पासुनीलंकापर्यंति ॥ मार्गीवृक्षवल्लीपाखाणपर्वत ॥ त्रे
णादिजीवसमस्त ॥ उद्धरी श्रीरघुनाथस्वलीळा ॥ ३३
॥ येवंनानावतारीजनार्दन ॥ यापरीउद्धरीसकळजन
॥ तेणेंयेकायेककेलापावन ॥ हेनवलकोणेंमानांचें ॥
३४ ॥ परिनवलकेलेमोटें ॥ मजमुर्खाचेंहीमुखवटें ॥ ॥२८

 श्र

॥३ली॥ श्रीभागवतबोलविलेमऱ्हाटें ॥ हेंआश्चिर्यवाटेमाझेंची
मज ॥ ३५ ॥ यालागीयेकाजनार्दनिशरण ॥ ज्याचीकृपाप
रिपूर्ण ॥ याचेंस्मरोनिश्रीचरण ॥ केलासंपूर्णसोळावा
॥ ३६ ॥ इतिश्रीभागवतेमहापुराणेएकादशस्कंधे
येकाकारटीकायांषोडशोध्यायः ॥ १६ ॥ श्रीरस्तु ॥
॥ श्लोकसंख्या ४४ वोविसंख्या ३३६ एवंऐक्य ३८०